दि. ०१/०१/२०२३

म. टा. पान नं. ०२

# पोलिसांना बदलीचे बळ

## १८ फेब्रुवारीपर्यंत ८० जणांना कार्यमुक्त करण्याचा 'मॅट'चा आदेश

ramesh.khokrale
@timesgroup.com
Tweet : @rameshkMT



**मुंबई :** जिल्हाबाह्य बदलीसाठी निकषांची पूर्तता होत असताना, बदलीसाठी पात्र ठरताना आणि संबंधित जिल्ह्यातील पोलिस दल प्रमुखांनी सेवेत रुजू घेण्याची तयारी दर्शवली असतानाही मुंबई पोलिस आयुक्तांनी कार्यमुक्त करण्यास नकार दिल्याने ८० पोलिस कॉन्स्टेबलना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) धाव घ्यावी लागली होती. अखेर 'मॅट'च्या आदेशाने या सर्व ८० पोलिसांना दिलासा मिळाला आहे. 'मुंबई पोलिस आयुक्तांनी या सर्व ८० पोलिस कॉन्स्टेबलना १८ फेब्रुवारीपर्यंत मुंबईतून कार्यमुक्त करावे आणि संबंधित जिल्ह्यांतील पोलिस प्रमुखांनी त्यांना रुजू करून घ्यावे', असे 'मॅट'चे न्यायिक सदस्य ए. पी. कुऱ्हेकर यांनी आपल्या आदेशात स्पष्ट केले.

पालक किंवा मुलांपैकी कोणाचा गंभीर आजार, शासकीय किंवा निमशासकीय सेवेत असल्यास पती-पत्नी यांना एकत्रित राहण्याची सोय व्हावी, अशा काही अपवादात्मक परिस्थितीत किमान तीन वर्षांची सेवा झाल्यानंतर अन्य जिल्ह्यातील सेवेसाठी बदली घेण्याचा पर्याय २६ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या जीआरद्वारे उपलब्ध करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने या पोलिसांनी आंतरजिल्हा बदलीसाठी मुंबईच्या पोलिस आस्थापना मंडळाकडे अर्ज दिल्यानंतर ते पात्र ठरले होते. त्यानंतर त्यांना सेवेत घेण्याच्या विनंतीबद्दल पुणे शहर, पुणे ग्रामीण, सांगली, सोलापूर ग्रामीण, औरंगाबाद ग्रामीण अशा विविध जिल्ह्यांतील व शहरांतील पोलिस प्रमुखांनी 'ना हरकत'ही दर्शवली होती. मात्र, मुंबई पोलिस आयुक्तालयात मनुष्यबळ तुटवडा असल्याचे कारण देत त्यांची बदलीची विनंती मुंबई पोलिस आयुक्तांनी फेटाळली होती. त्या निर्णयाविरुद्ध या सर्व पोलिसांनी ॲड. एस. एस. डेरे, ॲड. ए. व्ही. बांदिवडेकर व ॲड. एम. डी. लोणकर यांच्यामार्फत 'मॅट'मध्ये दाद मागितली होती.

'मुंबईत विविध श्रेणींतील पोलिसांची एकूण मंजूर पदसंख्या ४० हजार ६२३ असली तरी नऊ हजार ९१३ पदे रिक्त आहेत. शिवाय २०२२मध्ये यापूर्वीच एक हजार ८१७ पोलिसांना आंतरजिल्हा बदली दिली आहे. आंतरजिल्हा बदलीच्या कर्मचाऱ्यांची संख्या मंजूर पदांपैकी पाच टक्क्यांहून वर जाता कामा नये, अशी एक अट नियमात आहे. त्यामुळे या पोलिसांना बदली नाकारण्यात आली', असे म्हणणे आयुक्तांनी सरकारी वकील क्रांती गायकवाड यांच्यामार्फत मांडले.

पोलिस कॉन्स्टेबलच्या एकूण मंजूर २२ हजार १६७ पदांपैकी सहा हजार ३६७ पदे रिक्त असल्याची माहितीही देण्यात आली. मात्र, '२०२२मध्ये बदली मंजूर झालेल्या एक हजार ८१७ पोलिसांपैकी ११२ पोलिसांनी अन्य जिल्ह्यात जाण्यास नकार दिला आणि ते मुंबई पोलिस आयुक्तालयांतर्गतच सेवेत राहिले. त्याउलट बदली मागणाऱ्या या अर्जदारांची संख्या ८० आहे.

याशिवाय पोलिसांची नवी भरती प्रक्रिया सुरू असून अनेकांना प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले आहे. त्यानुसार मुंबई पोलिस आयुक्तांना नवे ५४६ पोलिस कॉन्स्टेबल मिळणार आहेत. त्यामुळे एकंदरीत परिस्थितीचा विचार करता पाच टक्क्यांच्या अटीचा भंग होत नाही. परिणामी आयुक्तांचा निर्णय बेकायदा व मनमानी स्वरुपाचा आहे', असे न्यायाधीशांनी सुनावणीअंती आपल्या निर्णयात स्पष्ट केले.

दि. ०९/०१/२०२३

१) म.२१.पान नं.०२

## माउंट मेरी चर्चवर हल्ल्याची धमकी



म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

वांद्रे येथील माउंट मेरी चर्चवर लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेकडून हल्ला होणार असल्याचा संदेश ई-मेलद्वारे आल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

माउंट मेरी चर्चचे अधिकृत छायाचित्रकार पिटर डिसूझा हे दोन दिवसांपूर्वी ई-मेल पाहत होते. यावेळी 'टेररिस्ट' हे नाव वापरून ई-मेल पाठवण्यात आल्याचे त्यांच्या लक्षात आले. लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेकडून चर्चवर हल्ला होणार आहे, असे या ई-मेलमध्ये नमूद करण्यात आले होते. त्यानंतर पीटर यांना आणखी एक ई-मेल आला. माझ्या मुलाची मानसिक स्थिती ठीक नसून त्याला क्षमा करावी. दहशतवादी हल्ल्याबाबत त्याने केलेला ईमेल खोटा आहे, असे दुसऱ्या ईमेलमध्ये नमूद करण्यात आले. याप्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी ई-मेल पाठविणाऱ्याचा शोध सुरू केला आहे.

२) म.२१.पान नं.०६

## माजी नगरसेवकासह १० जणांविरुद्ध गुन्हा

### शिंदे गट-भाजप हाणामारी प्रकरण

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

वाढदिवसानिमित्त लावलेल्या बॅनरवरून भाजपचे वागळे मंडळाचे सरचिटणीस प्रशांत जाधव यांना झालेल्या मारहाणप्रकरणी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे माजी नगरसेवक विकास रेपाळे यांच्यासह १० जणांविरुद्ध वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या मारहाणीमध्ये जाधव जखमी झाले होते.

एलबीएस मार्गावरील कशिश पार्कमधील पारिजात सोसायटीमध्ये प्रशांत जाधव राहतात. त्यांनी वाढदिवसानिमित्त बॅनर लावला होता. याच रागातून शुक्रवारी आरोपींनी सायंकाळी कशिश पार्कमध्ये लाथाबुक्क्यांनी, लाकडी बांबू, लोखंडी रॉडने मारहाण केली. तीक्ष्ण हत्याराने डोक्याच्या डाव्या बाजूस वार करण्यात आले अशी तक्रार जाधव यांनी केली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जाधव यांना झालेल्या मारहाणीनंतर आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे यांच्यासह इतर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात जाऊन मारहाण करणाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी केली होती.

३) म.२१.पान नं.०९.

## 'मंत्र्यांच्या तोंडाला कुलूप आहे'

### भास्कर जाधव यांची शंभूराज देसाईवर टीका

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'शिंदे सरकारमधील मंत्री शंभूराज देसाई हे कर्नाटकला जाणार होते. मात्र त्यांचा चंबू झाला आहे. राज्यातील मंत्र्यांच्या तोंडाला कुलूप लागले आहे', अशी टीका शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी शनिवारी केली. तर, भास्कर जाधव यांना फार महत्त्व देत नाहीत, असे प्रत्युत्तर देसाई यांनी दिले आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई हे गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राविरोधात शाब्दिक हल्ला चढवित आहेत. त्यावर शिंदे-फडणवीस सरकारकडून जशास तसे उत्तर देण्यात येत नसल्याचा आरोप करत जाधव यांनी शनिवारी देसाई यांच्यावर टीका केली. 'महाराष्ट्रावर आणि सीमावर्ती भागातील लोकांवर सकाळ-संध्याकाळ अन्याय करतात. मात्र, यासंदर्भात महाराष्ट्रातील सरकार तोंड उघडत नाही. राज्य सरकारच्या दोन मंत्र्यांनी राणाभीमदेवीच्या थाटात आम्ही कर्नाटकला जाणार असल्याचे सांगितले. मात्र त्यानंतर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी दम दिला आणि चंद्रकांत पाटील यांच्यासारखा मजबूत मंत्री आणि एक चंबू देसाई यांच्या तोंडाचा चंबू झाला', अशी टीका जाधव यांनी केली.

'सभागृहात बोलण्यासारखे काही नाही. बाहेर जाऊन बोलायचे. सरकारची बाजू मांडणाऱ्या मंत्र्यांवर टीका करायची. आमची काही संस्कृती आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी आम्हाला कोणत्या पद्धतीने काम करायचे याबाबत काही सूचना दिल्या आहेत. २०२४च्या निवडणुकीत काय होणार, याची चिंता जाधव यांनी करावी', असा उपरोधिक सल्ला शंभूराज देसाई यांनी दिला आहे.

दि. ०१/०१/२०

(५) पुढारी पान नं. ०५

# वर्सोवा पुलाची खासदारांकडून पाहणी

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर खाडीवरील बांधकाम सुरू असलेल्या नवीन वर्सोवा पुलाला तडे गेल्याचे आढळून आले आहे. पुलाच्या गर्डरची रचना कमकुवत असल्याने पूल धोकादायक बनल्याचा आरोप पालघरचे खासदार राजेंद्र गावित यांनी केला. नुकतेच त्यांनी बांधकामस्थळीच अधिकाऱ्यांना पुलाच्या कामातील दोष दाखवून दिले. यावर अधिकाऱ्यांनी आवश्यक तो बदल करण्याचे आश्वासन दिले आहे.

भाईंदर खाडीवर वाहनांसाठी मुंबई आणि गुजरातला जोडणारा पूल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे तयार करण्यात येत आहे. या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र या पुलाला अनेक ठिकाणी तडे गेले आहेत. तसेच पुलाची संरचना सदोष असल्याचा आरोप खासदार राजेंद्र गावित यांनी केला आहे. या पुलाच्या पाहणीसाठी त्यांनी थेट राष्ट्रीय महामार्ग आणि वाहतूक पोलिसांना घेऊन पुलाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. गावित यांच्या खासगी वास्तुविशारदांनी पुलाच्या कामातील दोष दाखवून दिले. पूलाचे बांधकाम झाल्यानंतर त्याला गर्डर टाकण्यात येत आहे.

(६) पुढारी पान नं. ०५

# बेशिस्त वाहनचालकांवर करडी नजर

**वसई :** सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक वाहनांची अहमदाबाद महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढलेली आहे. विशेष म्हणजे सलग शनिवार व रविवार अशा सुट्ट्या मिळाल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडल्याचे दृश्य पहायला मिळत आहे. बेशिस्त वाहनचालकांना चाप लावण्यासाठी पोलीस बंदोबस्तही वाढवण्यात आलेला आहे.

(७) पुढारी पान नं. १४.

# सागरी पर्यटनस्थळी थर्टी फर्स्टला बहर

**विरार :** सर्व सामान्य नागरीकांना देखील विकेंडचे पर्यटन गरजेचे झाले आहे. बाराही महिने किनाऱ्यांची मौज अनुभवताना थर्टी फर्स्ट हा वर्षाचा शेवटचा दिवस देखील किनाऱ्याच्या आसमंतात मौज मस्तीत घालविण्यासाठी तरुणाई व एकूणच रसिक आतूर असतात. गेल्या दोन वर्षात किनाऱ्यावर कोरोनामुळे फिरण्यास मर्यादा होत्या. त्यामुळे मौजमस्तीचा आनंद झाला नाही. यंदा मात्र सर्व किनाऱ्यावरील हॉटेल व रिसॉर्ट बुक झाली आहेत. किनाऱ्यावरील हॉटेल व रिसॉर्ट व्यवसायिकांना सर्वार्थाने हा थर्टी फर्स्ट अनुकूल आहे. एक तर सरकारने पहाटेपर्यंत मौजमस्तीची मजा सुरु ठेवण्यास मान्यता दिली आहे. मद्यदेखील मुबलक उपलब्ध असणार आहे. पोलिस अधिक्षकांनी व पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या मनाई आदेशानुसार ११ जानेवारी २०२३ पर्यंत सार्वजनिक ठिकाणी गोंगाट करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे यावर बंदी आहे. असे असले तरी यंदा थर्टी फर्स्टच्या लोकांच्या उत्साहामुळे मागील दोन वर्षात या व्यवसायाची आर्थिक मंदीने वाट लागली होती. मात्र; गेल्या काही दिवसापासून पर्यटनाला आलेला बहर लक्षात घेता हॉटेल, रिसॉर्ट, मद्य विक्रीची दुकाने, प्रवासी वाहतूक व एकूणच पर्यटनाशी निगडीत छोट्या-मोठ्या व्यवसायांना चांगला प्रतिसाद मिळत असून नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी थर्टी फर्स्टची रात्र मस्तीत न्हाऊन निघणारे विलक्षण आनंदाने नशेच्या व पर्यटनाच्या वातावरणात कमालीच्या उत्साहाने सामोरे जातील. इतर जगातील साथीचे आजार आणि कोरोनाचे भय बिलकूल नसताना केवळ इशारे हा आनंद रोखू शकत नाहीत. त्यामुळे थर्टी फर्स्ट वेगळ्या आनंदी क्षणांचा साक्षीदार असणार आहे.

दि. ०१/०१/२०२३

(5) पुढारी पान नं. १०.

# मिरा-भाईंदरमध्ये पदपथावर वाहनांची पार्किंग

## पादचाऱ्यांचे रस्त्यावरून मार्गक्रमण; अपघाताची शक्यता

भाईंदर : राजू काळे

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात अनेक पदपथ अतिक्रमणाच्या विळख्यात सापडू लागले आहेत. पदपथ पादचाऱ्यांच्या पदक्रमणासाठी लुप्त होऊ लागले की काय, असा प्रश्न पडू लागला आहे. अशातच काही पदपथ बेकायदेशीपणे वाहनांच्या पार्किंगमध्ये गायब होऊ लागल्याने पादचाऱ्यांना थेट वाहतुकीच्या रस्त्यावरून पदक्रमण करावे लागत आहे. यामुळे त्यांच्या अपघाताची शक्यता बळावली असून, त्यावर पालिकेसह वाहतूक शाखेने ठोस कारवाई करणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त होऊ लागले आहे. .

शहरातील अनेक पदपथांवर दुकानदारांसह गॅरेज, सेकंड हॅन्ड वाहने सेल्सवाल्यांनी अतिक्रमण केल्याचे समोर येत असताना आता या पदपथावर थेट वाहनांचे बेकायदेशीर पार्किंगच होऊ लागल्याने पादचाऱ्यांनी



चालायचे कुठून, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. पदपथांवर बसणाऱ्या फेरीवाल्यांवर पालिकेक्कडून कारवाई केली जात असली तरी काही ठिकाणच्या पदपथांवर अद्यापही त्यांचे अतिक्रमण सुरूच असल्याने पादचाऱ्यांना हक्काच्या पदपथाला मुकावे लागत आहे. तसेच काही ठिकाणची पदपथं दुकानदारांकडून काबीज करण्यात आली असून त्यावर सुद्धा पालिकेकडून कारवाई केली जात असली तरी पुन्हा त्या पदपथांवर अतिक्रमणांचा ये रे माझ्या मागल्या चा प्रकार सुरु होतो. याखेरीज अनेक पदपथ अनधिकृत गॅरेजने गिळंकृत केली असून त्यापोटी ते प्रोटेक्शन टॅक्स देत असल्याचे उघडपणे बोलू लागले आहेत. यामुळे पादचाऱ्यांना तेथील पदपथांना बगल देऊन वाहतुकीच्या रस्त्यावरून पदक्रमण करावे लागत आहे. पदपथावरील अनधिकृत गॅरेजवरील कारवाईसाठी तत्कालीन महासभेत धोरण निश्चित करण्यात आले आहे. पण त्याची अंमलबजावणी ठोसपणे होत नसल्याने पदपथावर बेकायदेशीरपणे गॅरेजचा व्यवसाय बिनबोभाटपणे सुरु असल्याचे दिसून येत आहे.

या गॅरेजवाल्यांकडून अनेकदा वाहतुकीचा रास्ता देखील व्यापला जातो. अशावेळी स्थानिक वाहतूक शाखेकडून तत्परता दाखवून एखाददिवशी कारवाई केली जाते. यानंतर पुन्हा त्यांचे बेकायदेशीर व्यवसाय पदपथांसह रस्त्यावर सुरु राहतात. याखेरीज काही सेकंड हॅन्ड कार विक्री करणाऱ्यांनी देखील पदपथावर कार उभ्या करून ते ग्राहकांना आकर्षित करतात व पादचाऱ्यांना वाहतुकीच्या रस्त्यावरून चालण्यास भाग पडतात. पदपथ व्यापणाऱ्या या कार पालिकेकडून जप्त केल्या गेल्यास पुन्हा पदपथांवर वाहने विक्रीसाठी ठेवली जाणार नाहीत, असा दावा केला जात आहे.

आता तर शहरातील पदपथावर वाहनांचे बेकायदेशीर पार्किंगच सुरु झाल्याने दाद मागायची कुठे, असा प्रश्न पादचाऱ्यांना पडू लागला आहे. हे पदपथ प्रामुख्याने बारच्या ठिकाणची असून ते आपल्या ग्राहकांची वाहने बिनदिक्कतपणे तेथील पदपथांवर पार्क करीत असल्याचे दिसून आले आहे. अशा बेकायदेशीर पार्किंगकडे वाहतूक विभागाचा हेतुपूरस्सर कानाडोळा होत असल्याचा आरोप होऊ लागला आहे. पालिकेकडून रस्त्यावर उभी असलेली वाहने जप्त केली जातात पण पदपथावर पार्क केलेल्या वाहनांवरील कारवाईला बगल दिला जात असल्याचा आरोप केला जात आहे.

पदपथांवरील या अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना थेट वाहतुकीच्या रस्त्यावरून पदक्रमण करावे लागत आहे. यामुळे त्याच्या अपघाताची शक्यता बळावत असून त्यांच्या संभाव्य अपघाताला जबाबदार कोण, अशा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

### चालकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

पालिकेने पदपथ व्यापणाऱ्या फेरीवाल्यांसह गॅरेज व सेकंड हॅन्ड कारच्या बेकायदेशीर पार्किंगवर ठोस कारवाई करावी तसेच पालिका व वाहतूक शाखेने पदपथावर बेकायदेशीरपणे पार्क केल्या जाणाऱ्या वाहनांवर संयुक्त कारवाई करून त्याला जबाबदार असलेल्यांवर गुन्हा दाखल करून पादचाऱ्यांच्या हक्काचे पदपथ मोकळे करून द्यावेत, अशी मागणी होऊ लागली आहे.

दि. ०१/०१/२३

७) लोकमत पान नं १२.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपारा येथील सतरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या पीडित अल्पवयीन मुलीला चेंबूर येथील २१ वर्षीय तरुणाने जून २०१९ ते एप्रिल २०२२ या दरम्यान तिच्या घरी अज्ञानीपणाचा फायदा घेत लैंगिक अत्याचार केला होता. यानंतर मुलीला दिवस गेले होते. तसेच तिने आता २८ डिसेंबरला एका मुलीला जन्म दिल्यानंतर याबाबत तुळींज पोलिस ठाण्यात शुक्रवारी आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

१०

## ब्लॅकमेल करत विवाहितेवर बलात्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ब्लॅकमेल करत विरारमधील एका विवाहितेवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विरार येथे राहणाऱ्या ३४ वर्षीय विवाहितेला बोईसर येथील आरोपींनी तिच्यावर इच्छेविरुद्ध नोव्हेंबर २०२१ ते २४ ऑगस्ट २०२२ दरम्यान राजोडी बीच, विरार व वसईतील हॉटेलवर लैंगिक अत्याचार केला होता. तसेच आपल्या अनैतिक संबंधांची माहिती तुझ्या पतीला सांगेन, अशी धमकी देत १४ लाख रुपये घेऊन फसवणूक केली होती. शुक्रवारी अर्नाळा पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

११) पुण्यनगरी पान नं. ०७.

## २८ वर्षांपूर्वीच्या हत्याकांडातील फरारी आरोपीस अटक



**मीरा रोड** : काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत २८ वर्षांपूर्वी कौटुंबिक वादातून राजकुमार व त्याच्या दोन साथीदारांनी जगरानीदेवी प्रजापती व तिच्या चार मुलांची निर्घृण हत्या केली होती. हत्या करून फरार झालेल्या आरोपी राजकुमार चौहान याला २८ वर्षांनंतर गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमीरा यांच्या पथकाने अटक केली आहे.

मीरा रोड येथील पेणकरपाडा भागात भारवाड चाळमध्ये राजनारायण प्रजापती कुटुंब राहत होते. त्यांच्या लहान मुलावरून शेजारी राहणाऱ्या सरोज यांच्यात झालेल्या भांडणातून तसेच रोज कटकट करत असल्याने वैतागून अनिल, सुनील आणि राजकुमार यांनी कट रचला आणि १६ नोव्हेंबर १९९४ साली राजनारायण कामावर गेल्यावर त्याच्या घरात घुसून त्यांची पत्नी जगरानीदेवी प्रजापती (२७), मुलगा प्रमोद (५), मुलगी पिंकी (३०), पिंटू (२), ३ महिन्यांचा लहान मुलगा यांची निर्घृणपणे हत्या करून पळून गेले होते. बरेच वर्ष गुन्हा उघडकीस न आल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा १ काशिमीरा पथकाने जून २०२१ मध्ये पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने वाराणसी येथे २० दिवस वास्तव्य करून तपास केला. त्यामध्ये आरोपी काल्या ऊर्फ राजकुमार अमरनाथ चौहान हा कामानिमित्त परदेशी असून, काही दिवसांनी तो मूळ गावी येणार असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी त्याचा पासपोर्ट नंबर मिळवून त्याला लूकआऊट केसवर टाकले. गुरुवारी २९ डिसेंबर रोजी काल्या ऊर्फ राजकुमार अमरनाथ चौहान कतार येथून विमानाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आला. तो लूकआऊट केसवर असल्याने विमानतळ प्राधिकरणाने त्यास थांबवून काशिमीरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले. गुन्हे शाखा आता त्याचे साथीदार अनिल आणि सुनील यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, पोलिसांनी आरोपीला ठाणे न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने त्याला ४ जानेवारी २०२३ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

लोकमत

# शिजानला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

## उद्या करणार मोठा गौप्यस्फोट

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** 'अलिबाबा दास्तान-ए-काबूल' मालिकेतील अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्याप्रकरणी आरोपी अभिनेता शिजान खानला शनिवारी वसई न्यायालयात हजर करण्यात आले. त्याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली असून त्याची रवानगी ठाणे मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे.

न्यायालयाने वालीव पोलिसांनी केलेली वाढीव पोलिस कोठडीची मागणी फेटाळली. यावेळी त्याच्या वकिलांनी सोमवारी गौप्यस्फोट करणार असल्याचे सांगितले. शिजान मानसिक तणावात असून त्याला समुपदेशन मिळावे, तसेच या प्रकरणात मीडिया ट्रायल सुरू असल्याने त्याच्या जीवाला धोका असल्याने पोलिस संरक्षण मिळावे, अशी मागणी त्याचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी न्यायालयात केली. शिजानला घरचे जेवण, कुटुंबीयांना भेटण्याची परवानगी मिळावी तसेच २ जानेवारीपर्यंत त्याचे केस कापण्यात येऊ नयेत, अशी मागणीही वकिलांनी केली.

शिजानच्या जामिनासाठी सोमवारी अर्ज केला जाणार आहे. तुनीषाच्या आईने केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर देण्यासाठी सोमवारी पत्रकार परिषद घेणार आहे. दरम्यान, या प्रकरणात लव्ह जिहादची शक्यता पोलिसांना फेटाळून लावली आहे.

Mumbai Main
Page No. 3 Jan 01, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# आय विटनेस समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी



थर्टी फर्स्ट व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी कळंब, राजोडी या समुद्रकिनारी वसईतील आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या पर्यटकांनी शनिवारी संध्याकाळी गर्दी केली होती. (छाया : मंगेश कराळे)

Hello Vasai
Page No. 2 Jan 01, 2023
Powered by: erelego.com

## नियोजन करताना आरोग्याची काळजी घेण्याचा मात्र विसर

# नववर्षाच्या स्वागत पार्ट्यांमध्ये दूध कमी अन् दारूच जास्त

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : थर्टी फर्स्टच्या माध्यमातून मावळत्या वर्षाला उत्साहात निरोप दिला गेला. तसेच २०२३ या नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्याच्या हेतूने अनेकांनी पार्टी, कार्यक्रमाचे बेत आखले. मात्र, थर्टी फर्स्ट व नववर्षाच्या स्वागताला दूध कमी प्यायले गेले तर दारू मात्र जास्त प्रमाणात रिचविली गेली. परंतु त्याचबरोबर आरोग्याची काळजीही घेणे गरजेचे आहे.

मावळत्या वर्षाला निरोप देण्यासाठी जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात थर्टी फर्स्ट पार्टीचे नियोजन केलेले दिसले. गेल्या पाच ते सहा दिवसांपासून अनेकजण याच्या नियोजनात व्यस्त होते. युवकांसह ज्येष्ठांच्याही पार्ट्या रंगलेल्या दिसल्या. थर्टी फर्स्ट व नववर्ष स्वागताच्या पार्टीसाठी जे खाद्यपदार्थ, साहित्य यांची आवश्यकता होती, त्याची तजवीज अनेकांनी दोन दिवस आधीपासून केली होती. काही ठिकाणी युवक, महिला वर्गासह बच्चे कंपनीने सोसायटीच्या आवारात, गच्चीत डीजे व इतर वाद्यांची व्यवस्था केली होती.



### १,००,००० लिटर दारू पोटात

रविवारीही सुटीचा दिवस असल्याने अनेकांचे पार्ट्यांचे बेत आहेत. त्यामुळे लाखो लिटर दारू मद्यपींच्या पोटात गेली असावी, असा अंदाज आहे.

### ५० टक्के वाटा विदेशी दारूचा

पालघर जिल्ह्यात प्यायला जाणाऱ्या दारूपैकी ५० टक्के वाटा हा विदेशी दारूचा आहे. सुशिक्षित व शहरी भागातील लोक विदेशी दारूला पसंती देतात.

### 'देशी'ही सुसाट

विदेशी दारूच्या विविध ब्रँडची किंमत अधिक आहे. सर्वसामान्य मद्य शौकिनांना ही महागडी दारू परवडत नाही. त्यामुळे अनेकजण देशी दारूवरच आपली भूक भागवताना दिसले.



### थंडीतही बियर जोरात



विदेशी दारूतील बियर हा प्रकार आरोग्यासाठी चांगला असल्याचा समज अनेकांना झाला असल्याने अनेक युवक बियर पिण्यावर भर देतात. सध्या थंडी पडली असून, अशा थंडीतही थंड बियर अनेकजण घेत असल्याचे दिसले.

### दारूमुळे महसुलात वाढ



पालघर जिल्ह्यात परवाना प्राप्त दारू दुकाने व बार आहेत. नववर्षाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात दारूची विक्री झाली. या दारूच्या विक्रीतून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.

### नववर्षाला दूध किती प्यायले?

नववर्षाच्या स्वागताला अनेकजण गोडधोड पदार्थ बनवून खातात. शिवाय आरोग्यदायी असलेल्या दुधाचे सेवन करतात. मात्र, दूध पिणाऱ्यांची संख्या खूप कमी आहे.



### मद्यामुळे हे होतात दुष्परिणाम

अति मद्यपानामुळे माणसाची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. काही जणांचे मानसिक संतुलन बिघडते. शिवाय पोटाचे विविध आजार जडतात. मद्यपान करून वाहन चालवल्याने वाहनावरील ताबा सुटतो. परिणामी, अपघाताची भीती असते.

Hello Vasai
Page No. 3 Jan 01, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# 'परवाना घेऊनच मद्य प्या'; वसईत समुद्रकिनारी दवंडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : नववर्षाच्या स्वागतासाठी विनापरवना मद्य पिणाऱ्यांवर तसेच, मद्यविक्री करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे वसईच्या समुद्रकिनाऱ्यावर दवंडी पिटविण्यात येत होती. नागरिकांनी मद्य परवाना घेऊनच मद्य प्यावे, असा संदेश दवंडीतून दिला जात होता. तर थर्टीफर्स्टसाठी पालघर जिल्ह्यात केवळ १६ जणांनीच मद्य परवाना घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

नववर्षाच्या स्वागतासाठी वसई-विरारच्या समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या रिसॉर्ट आणि ढाब्यांमध्ये बेकायदेशीरपणे मद्यविक्री केली गेली. मद्य पिण्यासाठी आणि मद्यविक्रीसाठीदेखील परवाना आवश्यक असतो. पालघर जिल्ह्यात केवळ १६ जणांनीच मद्य परवाना घेतला आहे. त्यामुळे नागरिकांनी नववर्षाचे स्वागत करण्यासाठी मद्य परवाना घेऊनच मद्य प्यावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे. याबाबत वसईच्या किनारपट्टीवरील कळंब, राजोडी, नवापूर, भुईगाव या भागांत दवंडी पिटवून जनजागृती केली गेली.

परवाना नसताना मद्य विक्री केल्यास तसेच, विनापरवाना सार्वजनिक ठिकाणी मद्य प्यायल्यास कारवाई केली जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाचे प्रमुख शंकर आंबेरकर यांनी दिली.

Hello Vasai
Page No. 1 Jan 01, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# ३१ डिसेंबरसाठी मद्य परवान्याकडे नागरिकांची पाठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : डिसेंबर महिन्यामध्ये नाताळ तसेच, नववर्षाच्या अनुषंगाने मद्य प्राशन करण्याचे एकदिवसीय परवाने वितरित करण्यात येत होते. ऑफलाइन आणि ऑनलाइन अशा दोन्ही पद्धतीने हे परवाने वितरित केले गेले. परंतु, वसई, विरारसह पालघर जिल्ह्यातील नागरिकांनी असे परवाने घेण्याकडे पाठ फिरवली आहे.

नाताळपर्यंत पालघरमधील २० जणांनी तर ३१ डिसेंबरसाठी १६ जणांनी मद्य परवाने घेतले होते. दुसरीकडे मद्य पिण्यासाठी जो परवाना लागतो, तोदेखील घेण्याचे प्रमाण कमी असल्याचे आढळले आहे. परवाने न घेणाऱ्यावर कारवाईचा इशारा राज्य उत्पादक शुल्क विभागाने दिला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 01, 2023
Powered by: erelego.com